# कार्यालय, नागपूर महानगरपालिका, नागपूर
## (सचिवालय)

**प्रस्तावना :-** प्रभाग क्र. 18, भुतेश्वर नगर येथील महानगरपालिका लाल प्राथमिक शाळेची
**{सा.बां.विभाग}** इमारत शिकस्त व जिर्ण असल्यामुळे जिवितहानी व वित्तहानी टाळण्याच्या दृष्टीने महानगरपालिका लाल प्राथमिक शाळेची इमारत तोडण्याच्या प्रसतावास मंजूरी मिळण्याकरीता सादर.

टिप :

1. प्रभाग क्र. 18 भुतेश्वर नगर स्थित महानगरपालिका लाल प्राथमिक शाळेची इमारतशिकस्त व जिर्ण झालेली असून, सार्वजनिक सुरक्षितेच्या संभाव्य धोका टाळण्याच्या दृष्टीने तोडण्यात येत असून त्याठिकाणी लाल शाळेच्या जागेवर शैक्षणिक अभ्यासिका प्रकल्प निर्माण करण्यात येत आहे.
2. सदर इमारतीचे स्ट्रक्चरल ऑडीट रिपोर्ट नस्तीत संलग्न आहे.
3. सविस्तर टिप्पणी नस्तीत संलग्न आहे.

## पारीत ठराव

**ठराव क्रमांक :- 14/मनपा/प्रशासक** **दिनांक :-** 22/12/2023

महाराष्ट्र शासन नगरविकास विभागाकडील शासन आदेश क्रमांक एमसीओ-२०२०/प्र.क्र. ७१ (भाग-२) /नवि-१४ दिनांक ०३/०३/२०२२ अन्वये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदी व विशेषत: कलम ४५२ अ च्या (१ अ) व (१ब) मधील तरतूदीनुसार दिनांक ०४-०३-२०२२ अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकारानुसार कार्यकारी अभियंता (डी.पी.डी.सी.), सार्वजनिक बांधकाम विभाग यांनी वरील प्रमाणे प्रस्तावीत केल्यानुसार प्रभाग क्र. 18, भुतेश्वर नगर येथील महानगरपालिका लाल प्राथमिक शाळेची इमारत शिकस्त व जिर्ण असल्यामुळे जिवितहानी व वित्तहानी टाळण्याच्या दृष्टीने महानगरपालिका लाल प्राथमिक शाळेची इमारत तोडण्याच्या प्रस्तावास मा. प्रशासक यांनी मंजुरी प्रदान केली.